गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ४५ वा ● शनिवार ०१ जुलै २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| Volume 1 | Issue 45 | Date : 01/07/2023 | blow : Saturday | Page 4 | Price 4

### राज्य सरकारचा निर्णय

## राज्यातील १२.५० कोटी जनतेला पाच लाखांचं आरोग्य विमा कवच

**मुंबई : राज्यातील आरोग्य विमा योजनेची व्याप्ती वाढवण्यात येणार असून नागरिकांना आता पाच लाखांपर्यंत विमा कवच मिळणार आहे. राज्यातील १२.५० कोटी नागरिकांना आता या अंतर्गत विमा सुरक्षा कवच मिळणार आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे.**

राज्यातील महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि केंद्राची आयुष्यमान भारत या योजनांचे एकत्रिकरण करण्यात येणार आहे. त्या माध्यमातून आरोग्य विमा योजनेची दीड लाखांची व्याप्ती वाढवून ती पाच लाख रुपये इतकी करण्यात येणार आहे. याचा फायदा राज्यातील १२.५० कोटी जनतेला मिळणार आहे. राज्यातील रुग्णालयांची संख्या देखील वाढवण्यात येणार आहे, तसेच दोन लाख कोटी लोकांना आरोग्य विम्याचे कार्ड वितरित करण्यात येणार आहेत.

या जन आरोग्य योजनेत सध्या मूत्रपिंड शस्त्रकियेसाठी असलेली अडीच लाख रुपयांची उपचार खर्चाची मर्यादा वाढवून ती साडे चार लाख रुपये एवढी



करण्यात आली आहे. महात्मा फुले योजनेत ९९६ तर प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेत १२०९ उपचार आहेत. यापैकी मागणी नसलेले १८१ उपचार वगळण्यात येतील. तर ३२८ नवीन उपचारांचा समावेश करण्यात येईल. प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेत देखील एकूण उपचार संख्येत १४७ वाढ होऊन, ती आता १३५६ एवढी होईल. हे जादाचे उपचार महात्मा जोतिराव फुले योजनेत देखील समाविष्ट होतील. त्यामुळे या योजनेत उपचार संख्या ३६० ने वाढेल.

या दोन्हीही आरोग्य योजनांमधील रुग्णालयांची संख्या एक हजार इतकी आहे. महात्मा फुले जन आरोग्य योजना याआधीच महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागात लागू करण्यात आली असून, महाराष्ट्रातील १४० आणि कर्नाटकातील सीमेलगतच्या चार जिल्ह्यातील १० अतिरिक्त रुग्णालये अंगीकृत करण्याचा निर्णय झाला आहे. याशिवाय आणखी दोनशे रुग्णालये देखील अंगीकृत करण्यात येतील. स्व. बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजनेचा समावेश देखील महात्मा फुले जन आरोग्य योजनेत करण्यात येईल. त्याचप्रमाणे यासाठी असलेली ३० हजार रुपयांच्या उपचारांची खर्चाची मर्यादा वाढवून प्रतिरुग्ण प्रति अपघात एक लाख रुपये अशी करण्यात येईल. या योजनेत महाराष्ट्र सीमा भागातील रस्ते अपघातात झालेले जखमी झालेले महाराष्ट्र राज्याबाहेरील किंवा देशाबाहेरील रुग्णांचा देखील समावेश करण्यात येईल.

## देवदर्शन करून येणाऱ्या क्रुझरला शिरवळवाडी जवळ भीषण अपघात सहा ठार दहा जखमी

### वेळेत रुग्णवाहिका न आल्यामुळे लहान बारा वर्षाच्या मुलाला जीव गेला






अक्कलकोट/विशेष प्रतिनिधी : शिरवळवाडी (ता.अक्कलकोट) येथे अक्कलकोट ते वागदरी जाणार्या रस्त्यावर सिमेंटचे कंटेनर व क्रुझरचा समोरासमोर अपघात होवून सहा ठार तर १० गंभीर जखमी झाल्याचे प्राथमिक माहिती मिळाली आहे.या घटनेबाबत जखमी नातेवाईकाकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, क्रुझरमधील भाविक हे अणूर (ता.आळंद, जि.कलबुर्गी) येथून नवस फेडण्याकरिता कर्नाटकातील अफझलपूर येथील भागम्मा देवी येथे जावून नवस फेडून गाणगापूर, अक्कलकोट येथे देवदर्शन करुन वागदरी मार्गे अणूरकडे जात असताना शिरवळवाडीच्या पुढे एक कि.मी.अंतरावर पुलाशेजारील वळणावर कलबुर्गीहून सोलापूरकडे येणार्या कंटनेर क्र.एम.एच.१२/युएम/७१८६ या गाडीने समोरुन येणार्या क्रुझर क्र.केए/३५/ए/७४९५ गाडीला शुक्रवारी दुपारी ४.३० वाजणेच्या सुमारास जोरदार ठोकरल्याने क्रुझरमधील चालकासह १६ जणापैकी ६ जण जागीच ठार झाले आहेत सदर अपघाताचे माहिती मिळताच वागदरी व शिरवळवाडी मधील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने गर्दी केले होते व यातील युवा तरुणाने बचाव करण्यासाठी खूप प्रयत्न करत होते परंतु वेळेत रुग्णवाहिका न आल्यामुळे बारा वर्षाच्या मुलाला जीव गमवावे लागले, यावेळी संघर्ष सामाजिक संस्थेचे अध्यक्ष श्याम बाबर,उपाध्यक्ष महादेव सोनकवडे, मकबूल कणमूसे , पंकज सुतार, । पान २ वर

> सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दुर्लक्षामुळे रोडच्या बाजूला झाडे झुडपे वाढल्यामुळे गाड्या अलीकडून पलीकडून येताना दिसत नसल्याने अशा प्रकारचे अपघात होत आहे तरी त्वरित रस्त्याच्या बाजूने वाढलेले झाडे झुडपे तोडण्यात यावे व सदर ठिकाणी ब्रिज जवळ स्पीड ब्रेकर बसवण्यात यावे
>
> **–महादेव सोनकवडे, उपाध्यक्ष संघर्ष सामाजिक संस्था वागदरी**

### 'समान नागरी'बाबत १३ जुलैपर्यंत वाट पाहावी लागेल

नवी दिल्ली : सर्वांना १३ जुलैपर्यंत वाट पाहावी लागेल आणि नंतर योग्य उत्तर मिळेल. लवकरच सर्व काही स्पष्ट होईल, असे मोठे विधान समान नागरी कायद्याबाबत केंद्रीय कायदामंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी केले आहे. एकीकडे भाजपविरोधी राजकीय पक्षांची एकजूट होत असतानाच केंद्रीय कायदामंत्री मेघवाल यांनी केलेले विधान चर्चेचा विषय ठरले आहे. केंद्र सरकारला ९ वर्षे पूर्ण होत असल्यानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना मेघवाल यांना समान नागरी कायदा आणि केंद्र सरकारची भूमिका यावर प्रश्न विचारण्यात आला. त्यावेळी ते म्हणाले की, सर्वांना १३ जुलैपर्यंत सर्व काही स्पष्ट होईल. केंद्र सरकार पावसाळी अधिवेशनात संसदेत समान नागरी कायद्यावर विधेयक आणू शकते, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. विरोधकही । पान २ वर

## शिंदे सरकारचे गिफ्ट! राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ


मुंबई : केंद्राच्या धर्तीवर राज्य सरकारनेदेखील आपल्या कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ केली आहे. राज्य सरकारने चार टक्क्यांनी महागाई भत्ता वाढवला आहे. महागाई भत्याचा दर ३८ टक्क्यावरून ४२ टक्के करण्यात आला आहे. हा महागाई भत्ता १ जानेवारी ते ३१ मे दरम्यानचा महागाई भत्ता जूनच्या वेतनामध्ये रोखीने दिला जाणार आहे. मागील अनेक दिवसांपासून महागाई भत्ता वाढवण्याची मागणी करण्यात येत होती. वर्षातून दोन वेळा महागाई भत्ता वाढवला जातो. आज अर्थ विभागाने शासन निर्णय काढून महागाई भत्ता वाढवण्यात येत असल्याचा निर्णय जाहीर केला आहे. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ३८ टक्क्यांवरुन ४२ टक्के करण्यात आलेला आहे.



केंद्राने ३ एप्रिल २०२३ रोजी महागाई भत्ता देण्याचा निर्णय घेतला होता. केंद्र सरकारने त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यामध्ये ४ टक्के वाढ केली होती. डीए आणि डीआरएमध्ये ही वाढ जानेवारी २०२३ पासून लागू करण्यात आली. मोदी सरकारने घेतलेल्या या निर्णयानंतर केंद्रीय कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ३८ टक्क्यांवरुन ४२ टक्के झाला आहे.

जुलै २०२१ मध्ये दीर्घ कालावधीनंतर केंद्र सरकारने केंद्रीय कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता १७ टक्क्यांवरुन २८ टक्के केला होता. यानंतर, ऑक्टोबर २०२१ मध्ये, आणखी ३ टक्के वाढ देऊन तो ३१ टक्के करण्यात आला. मग सरकारने मार्च २०२२ मध्ये । पान २ वर

## बुलढाण्यात प्रवासी बसचा भीषण अपघात, २५ प्रवाशांचा जागीच मृत्यू



बुलढाणा : बुलढाण्यात एका प्रवासी बसचा भीषण अपघात झाल्याची घटना घडली. यामध्ये २५ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला आहे. बसमध्ये एकूण ३३ प्रवासी होते. यातील आठ प्रवासी सुखरुप बाहेर पडले आहेत. बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजाजवळ पिंपळखुटा गावालगत समृध्दी महामार्गावर हा अपघात झाला आहे. ही प्रवासी बस नागपूरहून पुण्याला निघाली होती. त्यावेळी रात्री दीड वाजण्याच्या सुमारास ही भीषण घटना घडली.अपघातग्रस्त बस ही नागपूरहून पुण्याकडे जात होती. त्यावळेळी हा अपघात घडला. या बसमध्ये नागपूर, वर्धा, आणि यवतमाळचे प्रवासी होते. ही बस विदर्भ ट्रॅव्हल्सची होती. ही बस सिंदखेडराजाजवळ पिंपळखुटा गावालगत समृध्दी महामार्गावर रस्ता दुभाजकाला धडकली आणि । पान २ वर

## जातो माघारी पंढरीनाथा! तुझे दर्शन झाले आता..

पंढरपूर/प्रतिनिधीः आषाढी एकादशीला चंद्रभागेतील स्नानाची पर्वणी व लाडक्या विठुरायाच्या दर्शनाने तृप्त झाल्यानंतर द्वादशी दिवशी शुक्रवारी (ता.३०) भाविक परतीच्या प्रवासाला निघाले होते. जातो माघारी पंढरीनाथा! तुझे दर्शन झाले आता अशी भावना व्यक्त करीत जड अंत:करणाने लाखो भाविकांनी येथील चंद्रभागा बस स्थानक व पंढरपूर रेल्वे स्थानकावर गर्दी केली होती.यावर्षी पावसाला उशिरा सुरुवात होऊनही आषाढी यात्रे करिता सुमारे दहा ते बारा लाख वारकरी पंढरीत आले होते. दरवर्षी आषाढी यात्रेच्या सोहळ्याची सांगता पौर्णिमेला गोपाळकाल्याने होत असते. तदनंतरच वारकरी परतीच्या



प्रवासाला निघतात. मात्र कोरोना नंतर मागील वर्षीपासून द्वादशीलाच बहुतांश भाविक परतीच्या प्रवासाला निघाल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.यंदा देखील द्वादशी दिवशी लाखो भाविकांनी परतीची वाट धरली होती. पंढरपूर रेल्वे स्थानक व चंद्रभागा बस स्थानक परिसरात आपापल्या गावी परत जाण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. आषाढी यात्रेला आलेल्या भाविकांसाठी रेल्वे प्रशासनाच्या वतीने ज्यादा रेल्वे गाड्या सोडण्यात आल्या आहेत.

२४ जून ते ३ जुलै या दहा दिवसाच्या कालावधीमध्ये रेल्वेच्या नियमित गाड्यांच्या १०० तर ज्यादा । पान २ वर



दैनिक
# यश सिद्धि न्यूज

शनिवार दि.०१ जुलै २०२३


**✻ सुविचार ✻**

अनिश्चततेत सर्व दुःख भरलेले असते.

## संपादकीय

### मदतीची गरज...

१८७१ च्या जनगणनेनुसार वडार समाज हा मूळचा ओडिशा, आंध्र प्रदेश राज्यातील असून व्यवसायानिमित्त तो वेगवेगळ्या राज्यांमध्ये स्थिरावला आहे. ४५० वर्षे महाराष्ट्रावर राज्य करणारे सातवाहन वंशाचे ओडरा, उंडरा समाज होते. हे लोक शिवभक्त होते. त्यामुळे ओडिशा, आंध्र प्रदेशात शिव मंदिरे जास्त प्रमाणात आढळतात. याच सातवाहन साम्राज्याच्या काळात एक हजार गुफांची निर्मिती झाली. यामध्ये ओडस वडार समाजाचा मोठा सहभाग आहे. या समाजाने मोठमोठ्या लेणी, गुफा, राजमहल, किल्ले, रस्ते, तलाव यांचे बांधकाम केले आहे. तसे पाहता या समाजाचा इतिहास गौरवशाली आहे. मोठमोठी ऐतिहासिक प्राचीन मंदिरे, स्थळे यांच्याजवळ वडार समाजाची मोठी वस्ती दिसते. देश स्वतंत्र झाल्यानंतर प्रगती करण्यास सुरुवात झाली. त्यानुसार देशात बांधकाम क्षेत्र बऱ्याच माणात वडार समाजावर अवलंबून होते; परंतु, त्यानंतर या धंद्यामध्ये चांगला नफा मिळवता येतो असे बऱ्याच पुढारलेल्या समाजातील लोकांना कळल्यानंतर बांधकाम क्षेत्रात गुजराती, मारवाडी लोक उतरले. या समाजाकडे चांगल्या प्रकारे धन असल्यामुळे त्यांनी बांधकाम क्षेत्रात पैसे गुंतवण्यास सुरुवात केली. वडार समाजाचे पारंपरिक डबर, खडी, खोदकाम, बांधकामावर धनाढ्यांचे आक्रमण, दोन अत्याधुनिक अवजारांचा बांधकाम क्षेत्रात प्रवेश, जेसीबी, पोकलेन, हॉटमिक्सर प्लॉट इतर तसेच या धंद्यावर शासनाने लावलेले टॅक्स रॉयल्टी रूपाने असल्यामुळे वडार समाजाचे लोक देशोधडीला लागले आहेत. त्यांना काम करण्यासाठी कोणताही व्यवसाय उरलेला नाही. तसेच या लोकांमध्ये शिक्षणाचा अभाव, अंधश्रध्दा व दारिद्र्याचे प्रमाण जास्त आहे. हे कारागीर लोक आहेत. त्यांनी अद्याप शिक्षणाचे महत्त्व ओळखलेले नाही. त्यामुळे वडार समाजातील तरुण–तरुणी मिळेल तो रोजगार करू लागले. बांधकाम मजूर मार्केट यार्डमध्ये मजुरी, रिक्षा, टॅक्सी चालविणे असे अनेक उद्योग पत्करुन पोटापाण्याची व्यवस्था करू लागले आहेत. प्रामाणिक, कलासक्त असणाऱ्या या समाजाला सावरण्यासाठी शासनाने पुढाकार घेण्याची गरज आहे. कारण हा समाज संघटित नाही. या समाजाचा शासन दरबारी आवाज उठवण्यास आमदार, खासदार नाहीत. गौरवशाली परंपरा असणाऱ्या देशाच्या विकासात महत्त्वाचे योगदान देणाऱ्या समाजासाठी शासनाने मदत करण्याची गरज आहे.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३६ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सव

# रंग विनोदाचे, रंग सुरांचे' या मनोरंजनात्मक कार्यक्रमात सामाजिक, राजकीय चालू घडामोडीवर विनोदातून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले

## गायक– स्वप्नील गोडबोले, योगिता गोडबोले आणि सहकारी मुंबई ह्या कार्यक्रमाने ८ वे पुष्प संपन्न



अक्कलकोट/प्रतिनिधीः महाराष्ट्राचा प्रसिद्ध हास्य कलाकार भाऊ कदम, श्रेया बुगडे, कुशल बद्रिके यांचा चला हवा येऊ द्या फेम 'रंग विनोदाचे, रंग सुरांचे' या मनोरंजनात्मक कार्यक्रमात सामाजिक, राजकीय चालू घडामोडीवर विनोदातून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. याबरोबरच विविध गाण्याने रसिकातून प्रचंड प्रतिसाद मिळाला.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३६ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सव न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली होत असून, सायंकाळी ७ वा. चला हवा येऊ द्या फेम 'रंग विनोदाचे, रंग सुरांचे' सादरकर्ते – श्रेया बुगडे, भाऊ कदम, कुशल बद्रिके, मेघना एरंडे व गायक– स्वप्नील गोडबोले, योगिता गोडबोले आणि सहकारी मुंबई ह्या कार्यक्रमाने ८ वे पुष्प संपन्न झाले.

या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, सोलापूरचे धर्मादाय उपायुक्त सुनिता कंकणवाडी, सोलापूर जि.प. मुख्यकार्यकारी धिकारी दिलीप स्वामी, सोलापूरचे जेष्ठ विधिज्ञ अँड. नितीन हबीब, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, संदीप फुगे–पाटील, अकलूज येथील सहारा इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशनचे कार्यकारी अध्यक्षा डॉ. श्रद्धा जंज्वाळ, अभियंता राजेश निलवाणी, कॉंग्रेस शहर अध्यक्ष रईस टीनवाला, भारतीय स्टेट बँकचे क्षेत्रीय प्रबंधक निशांतकुमार जयस्वाल, नगर रचना विभागाचे नारायणराव जोशी, सुनील देशपांडे व श्रीमती मल्लम्मा पसारे, समीर लोंढे यांच्या हस्ते करण्यात आले. दरम्यान श्रींची प्रतिमा, नटराज व स्वर्गीय लतादीदी मंगेशकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांचा व कलाकारांचा सत्कार न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले व मंडळाच्या पदाधिकारी यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा कृपावस्त्र देऊन करण्यात आला. न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी व संजय कुलकर्णी यांच्या हस्ते मंत्र पठणाने पूजन संपन्न झाले.

यावेळी न्यासाचे विश्वस्त अलकाताई भोसले, अनुया फुगे–पाटील, अर्पिताराजे भोसले, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, स्मिता कदम, पल्लवी नवले, कविता वाकडे, क्रांती वाकडे, संगीता भोसले, अंजना पवार, उज्वला भोसले, सखी मंचचे सोनल जाजू, सुवर्णा साखरे, अनिता पाटील, माधवी धर्मसाले, उषा छत्रे, आशा भगरे, अश्विनी बोराळकर, डॉ. दीपमाला आडवितोटे, रोहिणी फुलारी, मिनल तोरस्कर, प्रियांका किरनळ्ळी, व न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त भाऊ कापसे, विश्वस्त संतोष भोसले, अँड.संतोष खोबरे, ओंकारेश्वर उटगे, उत्तम गायकवाड, दिलीप सिद्धे, अप्पासाहेब पाटील, प्रथमेश इंगळे, स्वामीराव मोरे, योगेश पवार, रोहित खोबरे, श्रीकांत मलवे, अतिश पवार, राजु नवले, सागर गोंडाळ, पिटू शिंदे, निखील पाटील, प्रवीण घाटगे, गोटू माने, अमित थोरात, बाळासाहेब घाटगे, बाळासाहेब पोळ, अरविंद शिंदे, प्रथमेश पवार, धनंजय गडदे, अप्पू कलबुर्गी, सौरभ मोरे, वैभव मोरे, राहुल इंडे, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, महादेव अनगले, सनी सोनटक्के व राजेंद्र पवार, मल्लिकार्जुन बिराजदार, दत्ता माने, श्रीनिवास गवंडी, प्रसन्न बिराजदार, प्रसाद हुल्ले, रमेश हेगडे, अनिल बिराजदार, शरद भोसले, महांतेश स्वामी, समर्थ घाटगे, धनंजय निंबाळकर, देवराज हंजगे, गोविंदराव शिंदे, आकाश शिंदे, धानप्पा उमदी, दीपक जरीपटके, अशोक स्थावरमठ, सुरेश रूगे, प्रकश घिवारे, सिध्दाराम भंडारकवटे, राहुल माने, मनोज इंगोले यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण, श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन श्वेता हुल्ले यांनी केले. तर न्यासाचे सचिव शामराव मोरे यांनी रसिकप्रेक्षकांचे स्वागत व आभार मानले. उत्कृष्ठ लाईट व्यवस्था अराद्य इलेक्ट्रिकल यांनी केले.

**गुणीजन गौरव : यामध्ये विशेषगौरव पुरस्कार कोल्हापूरचे सुहास पाटील, माजी नगरसेवक रामचंद्र समाणे व सिध्दाराम–शंकर प्रतिष्ठानचे प्रा. धनराज भुजबळ, पत्रकार रविकांत धनशेट्टी, ग्रामीण रुग्णालयाचे सौ. सुमन साळुंखे, गौडगांवचे जगद्गुरू पंचाचार्य प्रशालेचे सहशिक्षक लाडप्पा शिंदे, प्रसिद्ध व्यापारी सिध्दाराम टाके व सखी ग्रुप, अक्कलकोट यांचा न्यासाच्या वतीने गुणीजन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.**

**गुणवंत विद्यार्थी गौरव : तालुक्यातील इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत उत्तम गुण मिळवलेल्या ६ गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव न्यासाच्या वतीने करण्यात आला.**

**शनिवार दि. १ जुलै रोजी सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत स्वामिनी प्रस्तुत 'हिटस् ऑफ कुमार शानु' सादरकर्ते –संदीप पाटील आणि सहकलाकार पुणे यांचा कार्यक्रम होणार आहे.**

पान १ वरुन

### देवदर्शन करून येणाऱ्या क्रुझरला

जगन्नाथ कणमुसे, विनोद घुगरे, प्रदीप पोमाजी, शिवराज पोमाजी, राजू यादव, बसवराज मठपती , सतीश पोमाजी, धांलिंगप्पा पोमाजी, संतोष कणमुसे, अनिल घोडे, समर्थ भीमपुरे, सैदू कोळी, विजयकुमार सावंत, बंडू सावंत, दत्ता व्हदलूरे, हणमंत घोदे आदिने मदत कार्या करत होते. या. अपघातामधील ८ जण गंभीर जखमी तर २ जण किरकोळ जखमी झाली असून जखमींना अक्कलकोट ग्रामीण रुग्णालय येथे प्राथमिक उपचार करुन सर्वच्या सर्व जखमी रुग्णांना सोलापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय येथे पुढील उपचाराकरिता पाठविण्यात आले आहे.

यातील जखमींची नावे असे : क्रुझरचे चालक सुनिल हणमंतराव पांचाळ (वय ५०), सुमित पुजारी (वय ९), रेखा गोविंद पुजारी (वय ४०), गोपाल चंद्रकांत पुजारी (वय ५०), विठ्ठल हणमंत ननवरे (वय ३५), अजित अशोक कुंदले (वय ३०), भाग्येश अशोक कुंदले (वय ४०), अशोक पुनदिले (वय ४५), कोमल शामडे (वय ५०), कल्पना अशोक कुंदले (वय ४०) रा. सर्व अणूर (ता.आळंद, जि.कलबुर्गी) असे जखमींची नावे असून मयत झालेल्यामध्ये पाच स्त्री तर १ एक १२ वर्षाचा मुलाचा समावेश आहे. कंटेनर चालक अपघातानंतर फरार झालेला आहे. याबाबत अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचा काम चालु होते. या घटनास्थळी ग्रामीण पोलिस अधिक्षक, अक्कलकोट उपविभागीय पोलिस अधिकारी विलास यामावार, उत्तर पोलिस ठाण्याचे पो.नि.जितेंद्र कोळी, तहसिलदार बाळासाहेब शिरसाठ यांनी भेट देवून जखमींना उपचाराकरिता अक्कलकोटकडे पाठविण्यात आले. यावेळी ,चंद्रकांत पुजारी पोलीस उप निरीक्षक, हवालदार चिंचोळकर, हलवादार अंगद गीते ,पोलीस नाईक शरद चव्हाण, पोलीस नाईक कोल्हे ,पोलीस स्वामी, अवताडे ,शिंदे ,पाटील, राम चौधरी,, यासह वाहतूक पोलिस घटनास्थळी उपस्थित होते,

पुढे जाऊन कंटनेर एम एस इ बी फोल धडक दिल्यामुळे त्या ठिकाणचे विद्युत पुरवठा तार वायरमन वामने, बंडू मोरे यासह त्याच्या टीमने वेळेत काढल्यामुळे रस्त्यावरील वाहतूक जाण्यास मार्ग मोकळा झाले.

या अपघातात मयत झालेल्या सहाही मृतदेह शवविच्छेनासाठी अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले. सदरील अपघात घडल्यानंतर रिपाइं तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे, राजु भगळे, सोहेल बागवान, दिलीप सिध्दे, प्रभाकर पाटील, समीर शेख, श्रीशैल इसामंत्री, सुरेश गायकवाड, शिलामणी बनसोडे, दिनेश रुही, शुभम मडिखांबे, शिवा जमगे, गणेश कांदे, लादेन बागवान, नन्हु कोरबु, संजय राठोड, अंबादास गायकवाड आदींनी अपघातातील जखमींना अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयात आणून प्राथमिक उपचार करुन सोलापूरकडे प्राचारण करताना मदत केली.

### 'समान नागरी'बाबत १३ ..

याबाबत आक्रमक आहेत. विशेष म्हणजे, भारतीय विधी आयोगाने समान नागरी कायदाचा मसुदा संदर्भात १३ जुलैपर्यंत नागरिकांची मते मागवली आहेत. विवाह, घटस्फोट, देखभाल, वारसा हक्क, दत्तक, वारसा इत्यादी विषयांचा समान नागरी कायदा संहितेत समावेश आहे.

### शिंदे सरकारचे गिफ्ट!..

कर्मचाऱ्यांच्या डीएमध्ये तीन टक्क्यांनी वाढ केली होती. या वाढीनंतर कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ३१ टक्क्यांवरुन ३४ टक्के करण्यात आला आहे. त्यानंतर आता केंद्र सरकारकडून महागाई भत्त्यात ३८ टक्क्यावरुन ४२ टक्क्यांपर्यंत वाढ करण्यात आली आहे.

तमिळनाडूच्या राज्यसरकारने महागाई भत्यात चार टक्क्यांनी वाढ केली आहे. म्हणजेच आता तमिळनाडूनत महागाई भत्ता हा ३८ टक्क्यावरुन ४२ टक्क्यांवर पोहचला आहे. यामुळे सोळा लाख सरकारी कर्मचाऱ्यांना आणि पेन्शनधारकांना लाभ होणार आहे. हे नवे दर एक एप्रिलपासून लागू झाले आहेत. हिमाचल प्रदेशात महागाई भत्यात ३ टक्क्यांनी वाढ करण्यात आली आहे. तर राजस्थानमध्ये चार टक्क्यांनी महागाई भत्यात वाढ करण्यात आली आहे. तर आसामध्ये चार टक्के सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्यात वाढ करण्यात आली आहे. उत्तर प्रदेशातील कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्यात देखील वाढ करण्यात आली आहे. उत्तर प्रदेशात महागाई भत्ता ४२ टक्के झाला आहे. या निर्णयामुळे उत्तर प्रदेशात १६.३५ लाख सरकारी कर्मचाऱ्यांना आणि ११ लाख पेन्शनधारकांना लाभ होणार आहे.

### बुलढाण्यात प्रवासी बसचा भीषण..

त्यानंतर बसने पेट घेतला. डिझेलच्या संपर्कात आल्याने बसने वेगाने पेट घेतला. त्यानंतर बसमध्ये असणाऱ्या ३३ प्रवाशांपैकी आठ प्रवासी सुखरुप बाहेर पडले. तर २५ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला आहे. सुखरुप बाहेर पडलेल्यांमध्ये चालक आणि वाहकाचा समावेश आहे. दरम्यान, जखमींना जवळच्या शासकीय रुग्णालयात नेण्यात आलं आहे. यातील बहुतांश प्रवाशी हे नागपूर, वर्धा आणि यवतमाळचे आहेत.

बस पहिल्यांदा लोखंडी पोलला धडकली. त्यानंतर ही बस रस्ता दुभाजकाला धडकली. त्यानंतर बस पलटी झाली. बसचा दरवाजा गाडीखाली आल्यानं कोणालाच बाहेर येता आलं नाही. वाचलेले प्रवासी गाडीच्या काचा फोडून बाहेर आले. पोलीस आणि घटनास्थळी असलेल्यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे, बस सर्वात आधी नागपूरवरून औरंगाबादच्या दिशेने जाणाऱ्या मार्गावर उजवीकडे एका लोखंडी पोलला धडकली. अनियंत्रित होऊन पुढे जाऊन येणाऱ्या आणि जाणाऱ्या दोन्ही लेनच्या मध्ये असलेल्या कॉंक्रीटच्या दुभाजकाला धडकली आणि पलटली. बस पलटी होताना डाव्या बाजूने पलटली. त्यामुळं बसचे दार खाली दाबले गेले. त्यामुळं लोकांना बाहेर पडण्यासाठी मार्ग नव्हता. अपघातानंतर रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर बसमधील डिझेल सांडले आहे. त्यामुळं एक तर डिझेल टँक फुटली असावी किंवा डिझेल टँक मधून इंजनकडे सप्लाय होणारा पाईप फुटला असावा, त्यामुळेचं बसने पेट घेतला असल्याची शक्यता देखील वर्तवली जात आहे. जे लोक बचावले आहे त्यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे जे लोक काचेची खिडकी हाताने फोडून बाहेर निघू शकले त्यांचा जीव वाचला आहे. बसमधून २५ मृतदेह पोलिसांनी बाहेर काढले आहेत. जे मृतदेह बसमधून बाहेर काढण्यात आले आहेत, त्यांची ओळख पटवणे अडचणीचे होत आहे.

### जातो माघारी पंढरीनाथा!..

गाड्यांच्या ९४ फेऱ्या अशा एकूण १९४ फेऱ्या होणार आहेत. जवळपास अडीच लाख प्रवाशांनी यादरम्यान प्रवास केला असून सुमारे एक कोटी रुपयांचे उत्पन्न रेल्वेस प्राप्त होईल अशी माहिती पंढरपूर रेल्वे स्थानकाचे स्टेशन प्रबंधक बोलताना सांगितले.

एस. टी. महामंडळाने यात्रा कालावधीसाठी सुमारे ५ हजार बसेस उपलब्ध करून दिल्या आहेत. दरवर्षीप्रमाणे महामंडळाने यंदाही जिल्हा निहाय बस गाड्या सोडण्याचे नियोजन केले होते.

त्याप्रमाणे पंढरपूरच्या पंचक्रोशीतील गुरसाळे येथे विठ्ठल बसस्थानक, मोहोळ रस्त्यालगत भीमा बस स्थानक, सांगोला रस्त्यावरील बीडारी बंगल्यालगत पांडुरंग बस स्थानक व कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रवेशद्वारासमोरील नवीन चंद्रभागा बस स्थानक अशा चार ठिकाणाहून बस गाड्या सोडण्यात येत आहेत. चंद्रभागा बस स्थानकामध्ये ठाणे, रत्नागिरी, पुणे, सातारा, सांगली, रायगड व पालघर जिल्ह्यासाठी बस गाड्या सोडण्यात येत होत्या. यंदाच्या आषाढीला एसटी प्रशासनाने प्रथमच नव्याने बांधण्यात आलेल्या चंद्रभागा बस स्थानकाचा यात्रा कालावधीसाठी वापर सुरू केला आहे.त्यामुळे या बस स्थानकामध्ये शुक्रवारी सकाळ पासूनच लाखो भाविकांनी गर्दी केली होती. बस स्थानकातील प्रवाशांमध्ये महिला प्रवाशांची संख्या लक्षणीय दिसून येत होती. ठाणे येथे जाण्यासाठी भाविकांची मोठी रांग पहावयास मिळाली.

# सर्वसामान्य, गोरगरीब जनतेला न्याय देणारे सरकार, एक वर्षाच्या काळात घेतले लोकाभिमुख निर्णय : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

सातारा/प्रतिनिधीः राज्य शासन हे सर्वसामान्य व गोरगरीब जनतेला न्याय देणारे शासन आहे. गेल्या एक वर्षाच्या काळात शासनाने विविध लोकाभिमुख निर्णय घेतल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. पाटण तालुक्यातील मरळी, दौलतनगर येथे १२८ गावांतील १२२ कोटी ५९ लाख रुपयांच्या विविध विकास कामांचे ई – भूमिपूजन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी मुख्यमंत्री श्री.शिंदे हे दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. यावेळी राज्य उत्पादन शुल्क मंत्री तथा पालकमंत्री शंभूराज देसाई, मोरणा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रविराज देसाई, लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष यशराज देसाई आदी उपस्थित होते.

भूमिपूजन होणाऱ्या कामामुळे १२८ गावांतील लोकांना लाभ होणार असल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, शासनाने प्रलंबित विविध प्रकल्प मार्गी लावले आहेत. ३२ नव्या सिंचन प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. 'महात्मा फुले जन आरोग्य' योजनेची व्याप्ती वाढवून आता ही योजना राज्यातील सर्व नागरिकांना लागू केली आहे. त्यासाठी पिवळे, केशरी शिधा पत्रिका अशी कोणतीही अट नाही. या योजनेत आता ५ लाख रुपयांपर्यंतचे वैद्यकीय सहाय्य मिळणार आहे. सिंचनाच्या सुविधा वाढवण्यात येत आहेत. जलयुक्त शिवार, गाळ मुक्त धरण–गाळ युक्त शिवार अशा योजना पुन्हा सुरू केल्या आहेत. 'शासन आपल्या दारी'च्या माध्यमातून आज प्रशासन लोकांच्या घरी पोहोचले आहे.

लोकाभिमुख निर्णय घेतल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले की, नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये सानुग्रह अनुदानाचे वाटप करण्यात आले आहे. महिलांना एस. टी. प्रवासात ५० टक्के सवलत, केंद्राच्या किसान सन्मान योजनेत राज्य शासनातर्फे आणखी ६ हजार रुपयांची भर घालून आता १२ हजार रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बचत गटांना त्यांचे उत्पादन विक्रीसाठी मदत करण्यात येईल.



राज्य शासनाची वर्षपूर्ती आपण विकास कामांच्या माध्यमातून साजरी करीत असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. यावेळी पालकमंत्री श्री. देसाई म्हणाले की, राज्याच्या तिजोरीत भर घालणारा महत्त्वाचा विभाग म्हणजे उत्पादन शुल्क विभाग होय. या विभागाने २१ हजार ५०० कोटींचा महसूल जमा केला आहे.

ही महसुलातील २५ टक्के वाढ आहे. डोंगरी विकासासाठी २०० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. जिल्ह्याच्या पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी आराखडा बनवला जात आहे. कोयना, बामणोली, तापोळा, कास या ठिकाणी पर्यटन वाढीसाठी मोठा वाव आहे. या ठिकाणी पर्यटन विकास निश्चित केला जाईल. जिल्ह्यातील प्रत्येक गाव पक्क्या रस्त्याने जोडण्यात येईल. जिल्ह्यातील अनेक प्रलंबित सिंचन प्रकल्प मार्गी लावण्यात आले आहेत. संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना लाभार्थ्यांच्या मानधनात वाढ करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दूरध्वनीवरून ई–भूमिपूजन कार्यक्रमास तसेच वर्षपूर्ती निमित्त उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. यावेळी विकास कामे होणाऱ्या गावामधील सरपंच, सदस्य व पाटण विधानसभा मतदार संघातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# बार्टी तर्फे संविधान दिंडीच्या माध्यमातून महाराष्ट्रभर संविधानाचा जागर

## सुरेशजी खाडे,कामगार मंत्री उपस्थितीत 'बार्टी संविधान दिंडी'चा पंढरपूर येथे समारोप

पंढरपूर/प्रतिनिधी : आषाढी एकादशी दिनी पंढरपूर येथे बार्टी चे संविधान दिंडीचा समारोप राज्याचे कामगार मंत्री तथा माजी सामाजिक न्याय मंत्री मा.श्री.सुरेश खाडे यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न.यावेळी विशेष उपस्थिती म्हणून श्री.मोहन वानखडे,भाजपा अनुसूचित जाती मोर्चा संघटना मंत्री व श्री.सुनीलजी सर्वगोडजी यांचे उपस्थिती मध्ये झाले. यावेळी श्री.खाडे महोदयांनी,सामाजिक न्याय विभाग व बार्टी संस्थेने उत्कृष्ट उपक्रम नियोजित केलेबाबत बार्टीच्या महासंचालक श्री.सुनील वारे व समतादूत विभागाचे विशेष कौतुक केले.असे उपक्रम भविष्यात देखील हाती घ्यावे असे बार्टी संस्थेस सूचित केले.

सचिव,श्री.सुमंतजी भांगे ( सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन ) यांच्या मुख्य संकल्पनेतुन व आयुक्त,डॉ. प्रशांतजी नारनवरे (समाज कल्याण पुणे) व महासंचालक श्री. सुनील वारे (बार्टी) यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी,पुणे यांचेमार्फत संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्या बरोबर दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील या संविधान दिंडी चे आळंदी ते पंढरपूर आयोजन करण्यात आले होती.

महाराष्ट्रातील आराध्य दैवत संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे प्रस्थान आषाढी वारीस दिनांक ११ जून पासून सुरुवात झाली होती.यामध्ये राज्याच्या कानाकोपऱ्यातून दिंड्या दाखल होत्या. वारकरी दिंडी समवेत बार्टी ची संविधान दिंडी सोबत संविधान रथ देखील सज्ज झाला होता.आषाढी वारी पालखी सोहळ्यात यंदा वारकऱ्यांचा - प्रचंड उत्साह दिसून आला.पालखी सोहळा मध्ये दिंडेकरी, फडकरी,सेवेकरी पंढरपूर नगरीत माउलीच्या सोहळ्यासाठी सजली होती. राज्यभरातून वारकऱ्यांच्या दिड्या पंढरपूर येथे दाखल होत्या.पंढरपूर संस्थान कमिटी तसेच प्रशासन,पोलीस यंत्रणाचे काटेकोर उत्कृष्ट नियोजन यावर्षी होते.बार्टीकडून पालखी सोहळ्यात संविधान दिंडीच्या माध्यमातून संविधान विषयांवर तसेच संत महापुरुष विचारांवर जनजागृती करण्यात आली.यावेळी 'बार्टी' कडून संविधान विषयक प्रबोधन करण्यासाठी संविधान रथ सजऊन सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग महाराष्ट्र शासन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संविधान दिंडीच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली.

तमाम लाखो वारकरी बांधवांना भारतीय संविधानाची माहिती व्हावी,आपले अधिकार,कर्तव्याची जाणीव व्हावी तसेच संतांच्या समतावादी विचारांचा प्रसार व्हावा हा या संविधान दिंडीचा हेतू आहे. भारतीय संविधानाबद्दल तीन प्रश्न विचारून विजेत्यांना भारतीय संविधानाची प्रत,संविधान प्रास्ताविका भेट देऊन दिंडीत सन्मानित करण्यात आले.वारकरी बांधवांना भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकाचे वाटप करून त्यांना भारतीय संविधानाबद्दल आपल्या मूलभूत अधिकार व कर्तव्याची माहिती देण्यात येत आहे.नागरिकांना संविधानाच्या प्रास्ताविकाचे व बार्टी घडी पत्रिकेचे वाटप करून संविधान दिंडीचे महत्त्व विशद केले. संविधान चित्ररथास वारकऱ्यांचा आणि नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. वारकरी दिंडी च्या मार्गाने वारकऱ्यांच्या विसाव्या ठिकाणी प्रबोधनात्मक, संविधान आधारित विविध उपक्रम, कार्यक्रम,शाहीरी जलसा यांचे आयोजन करण्यात आले. संविधान दिंडीचा समारोप करण्याकरिता माननीय कामगार मंत्री, मा.श्री.सुरेशभाऊ खाडे साहेब यांचे स्वागत बार्टी प्रतिनिधी श्रीम.नसरीन तांबोळी सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापक समतादूत विभाग यांच्या वतीने करण्यात आला.यावेळी राष्ट्रीय प्रबोधनकार सप्तखंजेरी निर्माते प्रबोधनसम्राट सत्यपाल महाराज यांच्या प्रबोधन कार्यक्रमाने कार्यक्रमाची सांगता झाली.

यावेळी उपस्थित श्री.सुनिल सर्वगोड (संघटन सचिव रि.पा.ई.)




महाराष्ट्र राज्य,श्री.जितेंद्र बनसोडे प.महाराष्ट्र सरचिटणीस रि.पा.ई.,श्री. अरविंद कांबळे जि.उपाध्यक्ष रि.पा.ई., श्री.एड.किर्तीपाल सर्वगोड रि.पा.ई. शहराध्यक्ष पंढरपूर,श्री.श्रीकांत कसबे संपादक जोशाबा.,श्री.मुकुंद मागाडे, श्री.नागेश रणदिवे,श्री.आर.पी. कांबळे,श्री.विशाल मांदळे रि.पा.ई.युवक अध्यक्ष पंढरपूर इ.मान्यवरांचे तसेच संविधान दिंडीस सहकार्य करणाऱ्या सर्व अधिकारी कर्मचारी तसेच वारकऱ्यांचे बार्टी तर्फे आभार मानून कार्यक्रमचा समारोप संपन्न झाला.

संविधान दिंडीमध्ये बार्टीचे निबंधक इंदिरा आस्वार, विभाग प्रमुख श्रीमती स्नेहल भोसले,डॉ.सत्येंद्रनाथ चव्हाण,श्रीम.ऋषली शिंदे, श्री. रवींद्र कदम ,श्रीमती.आरती भोसले, श्री.सतीश पाटील,श्री.अनिल कारंडे, कार्यालयीन अधीक्षक सचिन जगदाळे व श्रीमती संध्या नारखेडे ,सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापक नसरीन तांबोळी,प्रकल्प अधिकारी प्रणिता कांबळे,प्रकल्प अधिकारी श्री.विजय बेदरकर अकोला जिल्हा प्रकल्प अधिकारी व समतादूत इ.समावेश होता. समारोपीय कार्यक्रमाचे प्रास्ताविक बार्टी सहा.प्रकल्प व्यवस्थापक श्रीमती नसरीन तांबोळी,सूत्रसंचालन प्रकल्प अधिकारी विजय पी.बेदरकर तसेच आभार प्रदर्शन समतादूत श्रीमती राजश्री कांबळे यांनी केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रणिता कांबळे राहुल कवडे श्री.मनोज खंडारे,श्रीमती तेजस्वी सोनवणे,श्रीमती विशाखा सहारे व श्रीमती उषा भिंगारे तसेच सोलापूर जिल्हा समतादूत राजेश्री कांबळे, अस्विनी सुपाते, नालंनदा शिंदे, किरण वाघमारे, यशपाल चनंदशिवे, मुकुंद लोंढे, अनुराधा पंडित, जोती ओव्हल यांनी परिश्रम घेतले.

# भीमआर्मीचे राष्ट्रीय अध्यक्ष चंद्रशेखर आझाद यांच्या वर हल्ला करणाऱ्याला कठोर शिक्षा द्या



नळदुर्ग/प्रतिनिधीः भीमआर्मी चे राष्ट्रीय अध्यक्ष चंद्रशेखर आझाद यांच्या वर हल्ला करणाऱ्याला कठोर शिक्षा द्या या मागणीसाठी रिपाई वतीने निवेदन देण्यात आले. भीमआर्मी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष चंद्रशेखर आझाद यांच्यावर सहारनपूर उत्तरप्रदेश येथे खुनी हल्ला झाला आहे.या घटनेचा निषेध करुन गुन्हेगाराला कठोर शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी निवेदन नरेंद्रजी मोदी प्रधानमंत्री भारत सरकार यांच्या कडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे जिल्हा समन्वय समिती सदस्य अरुण लोखंडे, अरविंद लोखंडे, परिवर्तन सामाजिक संस्था नळदुर्ग चे सचिव मारुती बनसोडे, भीम अण्णा सामाजिक संघटनेचे धर्मराज देडे, आरपीआय अल्पसंख्यांक आघाडीचे बाशिद भाई कुरेशी, पंचायत समिती तुळजापूर चे माजी सभापती प्रकाश चव्हाण, आरपीआय चे जिल्हा सल्लागार एस के गायकवाड यांच्या निवेदन सहाय्यक पोलिस निरीक्षक श्री सिद्धेश्वर गोरे पोलीस ठाणे नळदुर्ग यांच्या मार्फत सह्या केलेले निवेदन देण्यात आले

# अन्नदान सेवाकार्य राज्यातील धार्मिक क्षेत्राला दिशा देणारे : संकेत गोसावी



अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेले अन्नदान सेवाकार्य राज्यातील धार्मिक क्षेत्राला दिशा देणारे असल्याचे मनोगत कोल्हापूरचे उपविभागीय पोलिस अधिकारी संकेत गोसावी यांनी व्यक्त केले.

ते तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहकुटुंब आले असता न्यासाचे पुरोहित विश्वंभर पुजारी यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते.

यावेळी एस.के.स्वामी, सिद्धाराम कल्याणी, बाळासाहेब पोळ, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, नामा भोसले, दत्ता माने, राजेंद्र पवार, मल्लिकार्जुन बिराजदार,

दत्ता माने, श्रीनिवास गवंडी, प्रसन्न बिराजदार, प्रसाद हुल्ले, रमेश हेगडे, अनिल बिराजदार, शरद भोसले व महांतेश स्वामी, विशाल घाटगे, धनंजय निंबाळकर, समर्थ घाटगे यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# टाकळीवाडीचे सुपुत्र अनिकेत उगारे यांची मान्यता प्राप्त मूल्यांकार( अप्रुड व्हॅल्यूअर) म्हणून निवड

टाकळीवाडी : नामदेव निर्मळे



टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील इंजिनिअर अनिकेत उगारे यांची बँकेचे व्हॅल्युएशन कामासाठी मान्यता मिळाली आहे.अतिशय जिद्दीने यांनी शिक्षण पूर्ण करून करून इंजिनिअर पदवी मिळवली. शिक्षण एम. इ. व बी.ई. सिव्हिल स्ट्रक्चर झाले आहे. बी.ई. सिव्हिल २०१४ ला पूर्ण केले.एम .इ. इंजीनियरिंग २०१९ ला पूर्ण केले. नऊ ते दहा वर्षाचा बांधकाम क्षेत्र व इंडस्ट्रियल अनुभव आहे. सध्या ते इंडस्ट्रियल क्षेत्रात कार्यरत आहेत.आपल्या कार्याला कर्तव्यदक्ष मानणारे असे एक अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ओळख आहे.

# गुणवंतांचा गौरव हि भविष्या साठी प्रेरणाः आ.डॉ.लहामटे

## महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचा गुणगौरव समारंभ संपन्न!





अहमदनगर/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचा १० वी, १२वी तसेच स्पर्धा परीक्षा गुणवंत विद्यार्थी गौरव हा त्यांच्या भविष्यासाठी प्रेरणा देणारा आहे. आपल्या पुढील भविष्या साठी गौरव रुपी ऊर्जा घेवुन हे पुरस्कारार्थी तालुक्याचे व देशाचे नाव उज्ज्वल करतील असे प्रतिपादन अकोल्याचे आमदार डॉ किरण लहामटे यांनी केले.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ विश्वासराव आरोटे होते यावेळी विठुरायाच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थी गौरव समारंभात ते बोलत होते. व्यासपीठावर शिर्डी साईबाबा संस्थान चे विश्वस्त डॉ. जालिंदर भोर, तहसीलदार सतिष थेटे, गटशिक्षणाधिकारी जालिंदर खताळ, अमृतसागर दुध संघाचे जनरल मॅनेजर दादाभाऊ सावंत, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे उत्तर महाराष्ट्र विभागीय सचिव अनिल रहाणे,जिल्हाध्यक्ष राजेश जाधव,प्रसिध्दी प्रमुख भाऊसाहेब वाकचौरे, पुणे जिल्हा संपर्क प्रमुख सुभाष डोके,माजी अध्यक्ष प्रा विद्याचंद्र सातपुते,अध्यक्ष अशोक उगले, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुनिल धुमाळ, सचिव तुकाराम कानवडे,सरपंच बाबासाहेब उगले, सरपंच राजेंद्र गवांदे, सरपंच संतोष आंबरे, लिंगदेव ग्रामपंचायत सदस्या कल्पनाताई फापाळे या मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मान चिन्ह, प्रशस्ती पत्र व शालेय साहित्य देवून गौरविण्यात आले. प्राचार्य दिलीप रोंगटे,मुख्याध्यापक गोपिनाथ हाडवळे,मुख्याध्यापक अशोक नेरकर यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. शाल पुष्पगुच्छ,सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, विठ्ठल रुक्मिणी मूर्ती, पुणेरी पगडी ने त्यांना सन्मानित करण्यात आले.

गुणवंतांच्या पाठीवर गौरव रुपी थाप टाकून पत्रकार संघ अतिशय महत्वाची भूमिका बजावत आहे. पत्रकार संघ सामाजिक बांधिलकी जपून आपले कार्य करत आहे पण आपले आई वडील,शाळा ,गाव, तालुका व देशाचे नाव उज्ज्वल करण्याचे काम यापुढे आपल्याला करायचे असल्याचे डॉ लहामटे म्हणाले.१३ ते २१ या वयात मुला मुलींपुढे अनेक प्रलोभने येत असतात पण यातून तावून सुलाखून बाहेर पडला तर तो नक्कीच यशस्वी होईल.आपल्या आई वडील व शाळेचे नाव कमी होणार नाही असे कोणतेही काम करू नका असे आवाहन त्यांनी केले.डॉ जालिंदर भोर यांनी आषाढी एकादशी निमित्ताने पत्रकार संघाने कार्यक्रमाचे आयोजन केले त्यामूळे पंढरपूर ला न जाता अकोले हेच पंढरपूर व सर्व विद्यार्थी शिक्षक व पत्रकार संघाचे पदाधिकारी यांच्या रूपात पांडुरंग भेटीचा आनंद भेटल्याचे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांनी शिक्षकी ज्ञानाबरोबरच संस्कार व अध्यात्माचाही अंगिकार करावा असा आशावाद व्यक्त केला गटशिक्षणाधिकारी जालिंदर खताळ यांनी तालुका आदिवासीं असूनही शैक्षणिक गुणवत्तेत आज अव्वल स्थानी असल्याचे सांगितले. पत्रकार संघाचे कार्य प्रेरणादायी असून शिक्षण विभागास पूरक काम होत असल्याचे सांगितले.अध्यक्षीय भाषणात डॉ विश्वासराव आरोटे यांनी पत्रकार संघ दरवर्षी राज्यभरात सर्व जिह्यातील दहावी बारावी तसेच एम पी एस सी, यू पी एस सी, व इतर स्पर्धा परीक्षा मधील गुणवंतांचा सत्कार करत असतो. अकोल्यातील कार्यक्रम हा ग्रामीण आदिवासी भागातील असूनही राज्याला दिशादर्शक आहे. सर्व गरजू विद्यार्थ्यांना वह्या पुस्तके, दप्तर, रेनकोट छत्री यांचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

प्रास्ताविकातून अनिल रहाणे यांनी पत्रकार संघाचे कार्य विषद केले. स्वागत व पाहुण्यांचा सत्कार भाऊसाहेब वाकचौरे व अशोक उगले यांनी केले.सूत्रसंचालन कार्याध्यक्ष दत्ता जाधव ,सचिन लगड यांनी तर आभार प्रविण धुमाळ यांनी मानले. यावेळी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष हरिभाऊ फापाळे , ललित मुतडक, वसंत सोनवणे, हल्ला विरोधी समिती जिल्हा प्रमुख संतोष साळवे,शंकर संगारे, खजिनदार सुरेश देशमुख, सचिन लगड.जगन्नाथ आहेर, सुनिल शेणकर, दत्ता हासे निखिल भांगरे, ओमकार अस्वले , सुनिल आरोटे . आविष्कार सुरशे.आदि पत्रकार उपस्थित होते.विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले

## शब्दकोडे क्र ४५



आडवे शब्द १.सुलभ मिळालेले,कष्ट न घेता ३.गुजरातमधील एक प्रसिद्ध शहर ५.गोलमाल चित्रपटाचा नायक ९.किंमत,भाव १०.कारण,निमीत्त १२.सूर्य,दही घुसळण्याचे साधन १३.२६जानेवारी १६.जहाजात वापरण्यात येणारे एक दिशा दाखण्याचे यंत्र १९.धाक,जरब २१.हिसका,दचका २३.रात्री घातलेली पाळत २४.आंब्याचा रस २६.रमरम उलटे करा ३०.इंग्रजीत झाड ३१.क्रौच,एक पक्षी ३३.फणसाची एक जात ३६.पुरे,बेस्टचे एक वाहन ३७.दणकट,राकट ३९.एक मोठा व सुस्त साप ४०.चाट,थाप ४२.ज्याला वारीस नाही असा हिंदीत ४४.पाठवणी,बिदागी ४५.हिंदीत कालचा ४६.अफुचे बी ४८.संत,महंत ४९.मगर ५१.कमीत कमी ५३.एक ताणला जाणारा पदार्थ ५४.काजळ,अंजन हिंदीत ५५.मातीसारखी चव असेलेले ५७.ताजा,तवाना ६०.धारण करणारा ६१.मध ६३.विश्व ६४.संक्रांतीला स्त्रीया हे लुटतात ६५.लहान मुलींचा फ्रॉक ग्रामिण ६७.पावा,बासरी ७०.कढविलेला ऊसाचा रस ७२.मोहन उलटे करा ७३.आरंभ,श्रीगणेशा ७५.हरवणे,गडप ७६.घोडयाला काबुत ठेवण्यासाठी आवश्यक ७७.रानातला मेवा ७८.अजय देवगण,करीश्मा कपुर,जीवन,परेश रावल यांचा एक चित्रपट

उभे शब्द १.सडक,आँखे आदी चित्रपटात खलनायक तथा हास्यकलाकाराचे काम करणारा एक नट २.अमिताभ बच्चन,किमी काटकर यांचा 'जुम्मा चुम्मा'या गीताचा चित्रपट ३.बरकत,भरभराटीचा काळ ४.त्रास,यातना ५.शेवट,अंत ६.मुलगा हिंदीत ७.हात,हस्त ८.आठवडयातील सुटीचा वार १०.शासन,शिक्षा ११.बहुजन समाजवादी पार्टीचे संक्षिप्त रूप १३.धडा,पाठ,मामला १४.कारल्याची चव,कडवट १५.वस्तु,पर्वत १६.संमती कळवणे,मान्य १७.इंग्रजीत तरूणासारखा १८.त्रासलेला २०.स्वयंपाक घरातील एक साधन २२.वीस उभेचे उत्तर २५.पाण्याचा संतत पडणारा बारीक प्रवाह २७.कामदेव,रतीपती २८.एक उंच उडणारा पक्षी ३१.सोन्याची परीक्षा,सत्व ३२.मोठा विळा ३३.चांगला,भला ३४.लोखंड साफ करण्याचे साधन ३५.प्रायव्हेट मराठीत ३६.सुबत्ता,भरभराट ३७.धाण्याचा तुरा ३८.समाप्त हिंदीत ३९.सतत,अखंड ४०.महाभारतातील एक राक्षस ४१.जमीन साफ करण्याचे एक शेतकी साधन ४३.खाली,रिक्त ४७.एक मराठी आडनाव ४८.सोबत रांगेत बसुन जेवणे ५०.मनाची तृप्ती ५१.किडा,कृमी ५२.रोख,पैसे देऊन ५४.मुलगा,धागा ५५.वानर,कपी ५६.इंदिराजींच्या आईचे नाव ५८.वाळुच्या रेघावरून शकुन पाहण्याची एक क्रिया ५९.गाण्याचा सराव ६२.रंजन करणारे ६३.जामीन घेणे,हमी ६४.गाईचे बाळ ६६.गाजावाजा,बोभाटा ६७.ज्याचे मोल करता येत नाही असे ६८.हिंदीत दास,अमीर खान,राणी मुखर्जी यांचा 'आती क्या खंडाला' गाण्याचा चित्रपट ६९.पडणे,ऱ्हास ७०.चिंता,फिकीर ७१.इंग्रजीत विजेता ७३.मुलाची बायको ७४.पवन,वात

## जल जीवन मिशन अंतर्गत ग्रीड पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन

# ‘हर घर जल’अंतर्गत प्रत्येक घराला पाणी मिळणार : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

औरंगाबाद : केंद्र सरकारने ग्रामीण कुटुंबांना नळ जोडणीद्वारे पुरेसे आणि सुरक्षित पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी जलजीवन मिशन सुरू केले आहे. गंगापुर तालुक्यात देखील ‘हर घर जल’ व्दारे ३७३ गावांमध्ये नळजोडणी देण्यात येणार आहे. १ हजार कोटी रुपयांची ही योजना मंजूर झाली असून आता प्रत्येक घराला केवळ १० पैशात एक लिटर शुद्ध पाणी मिळणार असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केले.

गंगापूर येथे जलजीवन मिशन अंतर्गत ३७३ गावे ग्रीड पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड, सहकार मंत्री अतुल सावे, आमदार सर्वश्री हरिभाऊ बागडे, प्रवीण दरेकर, प्रशांत बंब आदी उपस्थित होते. कार्यक्रमानंतर व्यासपीठावर उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते विविध योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना किट वाटप करण्यात आले.

श्री. फडणवीस म्हणाले, ‘हर घर जल’ योजनेंतर्गत प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला प्रतिव्यक्ती ५५ लिटर पाणी मिळणार आहे. आमदार प्रशात बंब यांच्या पाठपुराव्यामुळे गंगापूर उपसा सिंचन योजनादेखील लवकरच पुर्णत्वास येईल. या योजनेमुळे तालुक्यातील ३० हजार हेक्टर जमीन पाण्याखाली येणार आहे. सिंचन योजनेमुळे शेतकऱ्याचे जीवनमान उंचावणार आहे. शासनाने एका वर्षात विविध लोकाभिमुख निर्णय घेतले आहेत. आपले शासन गतिमान आहे. एका वर्षात आठ योजनांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिली असून यामुळे राज्यातील साडे आठ हेक्टर जमीन पाण्याखाली येणार असल्याचेही ते म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारला ९ वर्ष पूर्ण झाले आहेत. या कालावधीत देशात अनेक कल्याणकारी योजना राबविण्यात आल्या आहेत. महाराष्ट्रातदेखील पंतप्रधान मोदी यांनी २५ लाख नागरिकांना घरे तर ७२ लाख नागरिकांना मोफत आरोग्य सेवा दिल्या आहेत. महाराष्ट्रात साडेसतरा कोटी मोफत लसीकरण करण्यात आले आहे. राज्यात १ कोटी १० लाख लोकांना पिण्याचे शुध्द पाणी मिळते आहे. उज्वला योजनेअंतर्गत ३९ लाख महिलांना गॅसजोडणी मिळाली आहे. कौशल्य विकास योजनेअंतर्गत १० लाख तरुणांना प्रशिक्षण आणि रोजगार उपलब्ध झाला आहे. मुद्रा योजनेअंतर्गत ४१ लाख तरुणांना कर्जपुरवठा करण्यात आला असून त्यातील ५० टक्के महिला असल्याचा उल्लेखही उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केला.

प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेतून ३६ लाख मातांना लाभ देण्यात आला आहे. राज्यात ४ लाख कोटी रुपयांची विकासाची कामे सुरू आहेत. नमो सन्मान मध्ये केंद्र आणि राज्य सरकारचे दरवर्षी १२ हजार रुपये शेतकऱ्यांना मिळणार आहेत. आपले शासन शेतकऱ्यांच्या नेहमीच पाठीशी उभे राहीले आहे. शेतकऱ्यांना आता केवळ १ रुपयांत विमा मिळणार आहे. शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना सुरू करण्यात आली असून या योजनेतून शेतकऱ्यांना दिवसा १२ तासांची वीज मिळणार आहे. जलयुक्त शिवार योजना पुन्हा सुरू करण्यात आली आहे. एसटीमध्ये महिलांना ५० टक्के सवलत देण्यात आली आहे. तसेच ७५ वर्षांवरील नागरिकांना मोफत प्रवासाचीही योजना आहे. ५ लाखापर्यंत आरोग्य सेवा मोफत मिळणार असून यामुळे गरिबांना चांगले उपचार मिळणार असल्याचे श्री. फडणवीस म्हणाले.

श्री. फडणवीस म्हणाले, राज्यातील १२ कोटी नागरिकांना आरोग्य कार्ड देण्यात येणार आहे त्यामुळे सर्व आजारावर मोफत उपचार मिळणार आहेत. नागरिकांना घरे देण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना, शबरी आवास योजना, रमाई आवास योजना प्रभावीपणे राबविण्यात आल्या आहेत. इतर मागास वर्गीय घटकासाठी देखील मोदी आवास योजनेअंतर्गत १० लाख घरे मोफत देण्याची योजना आहे. पश्चिमी वाहिन्या नद्यांचे पाणी मराठवाड्यात आले पाहिजे ही जुनी मागणी होती. समुद्रात वाहून जाणारे पाणी गोदावरीच्या खोऱ्यात आणणार आणि मराठवाडा पाणीदार करणार आहे. देशातील गरिबी कमी झालेली असून अर्थव्यवस्था पाचव्या क्रमांकावर आली आहे. २२ लाख कोटी रुपये लाभार्थ्यांच्या खात्यात आले असून १५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक जिल्ह्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे म्हणाले, जलजीवन मिशन अंतर्गत गंगापूर तालुक्याला पाणी मिळणार आहे. प्रत्येक नागरिकाला रोज ५५ लिटर पाणी देण्यासाठी ‘हर घर जल’ ही योजना सुरू केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गरिबांसाठी अनेक कल्याणकारी योजना राबविल्या आहेत. या योजनाची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी विशेष अभियान सुरू करण्यात आले आहे. कोरोना काळात गरीब लोकांना १० किलो अन्नधान्य दिले असून आताही ५ किलो अन्नधान्य मोफत देण्यात येत असल्याचे ते म्हणाले.




केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ भागवत कराड म्हणाले, नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी अनेक योजना प्रभावीपणे राबविल्या आणि जनतेचे कल्याण केले आहे. आपला जगात बहुमान होत आहे. आपला देश आता सुरक्षित आहे. जगात आपल्याकडे विश्व गुरू म्हणून पहिल्या जाते. जनतेची सेवा, गरीबांचे कल्याण हेच सरकारचे ध्येय असून सर्वाचा विकास करणे हेच ब्रीदवाक्य आहे. अंत्योदय अंतर्गत अनेकांना अन्नधान्य मिळत आहे. उज्ज्वला गॅस, अवास योजना, जन धन योजने अंतर्गत गरिबांचे बँकेत खाते उघडण्यात आले असल्याचे ते म्हणाले. आमदार प्रशांत बंब यांनी प्रास्ताविक केले. २०१४ साली देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना ’जल आराखडा’ तयार केला आहे. सर्वांना हक्काचे पाणी मिळत आहे. वॉटर ग्रीड अंतर्गत ६० लाख ६२ हजार नळजोडणी तालुक्यात होणार असल्याचे ते म्हणाले.यावेळी शेतकरी, ग्रामस्थ, नागरिक, लाभार्थी तसेच विविध यंत्रणांचे प्रमुख उपस्थित होते.

## पांडुरंग कारखाना ९००० मॅट्रिक टन प्रतिदिन गाळप करणार : चेअरमन प्रशांत परिचारक



पंढरपूर/ प्रतिनिधीः श्रीपुर तालुका माळशिरस तालुक्यातील श्रीपुर येथील कर्मयोगी सुधाकर पंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना कारखान्यात रोलर पूजन नुकतेच झाले यावेळी कारखान्याचे चेअरमन प्रशांत परिचारक मना लेखी आगामी हंगामात साखर कारखाना प्रतीक दिन नऊ मॅट्रिक टन क्षमतेने गाळप करणार आहे ते म्हणाले की कारखाना कार्यक्षेत्रात १२ लाख मेट्रिक टन उसाच्या नोंदी झाल्या आहेत नोंद झालेल्या सर्व उसाचे नियोजनबद्ध गाळप केले जाणार आहे यासाठी ऊस तोडणी वाहतूक करार करण्यात आले आहेत प्रशांतराव परिचारक म्हणाले की मागील हंगामात कारखान्याने नऊ लाख ५५ हजार ५९० क्विंटल साखर पोत्यांचे उत्पादन केले आहे त्याचबरोबर अश्विनी प्रकल्पातून १.६० कोटी लिटर को जन प्रकल्पातून ६.७१ कोटी युनिट वीज निर्मिती करण्यात आल्याची माहिती प्रशांत परिचारक यांनी दिली यावेळी संचालक दिनकरराव मोरे वसंतराव देशमुख दिलीप चव्हाण व सर्व संचालक सभासद शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या मुंबई मुख्यालयास मंत्री चंद्रकांत पाटील यांची भेट



सोलापूर/प्रतिनिधीः अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या मुंबई मुख्यालयास राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री व संसदीय कार्यमंत्री तथा मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष नामदार चंद्रकांत पाटील यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील (मंत्री दर्जा),महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मंगेश मोहिते तसेच महामंडळाचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत प्रामुख्याने मराठा समाजाकरिता कार्यरत असणाऱ्या व्याज परतावा योजनांची सविस्तर माहिती,योजनांची कार्यपध्दती यांची माहिती यावेळी सादर करण्यात आली. यावेळी मंत्री महोदयांनी संगणकावर प्रत्यक्षातङजखनिर्माण करण्याची प्रक्रिया,कर्ज मंजुरीची प्रक्रिया,व्याज परतावा कशा प्रकार देण्यात येतो, याची प्रक्रिया सविस्तर समजून घेतली व ४,३३३ लाभार्थ्यांना रु. ३ कोटी ७५ लाख व्याज परताव्याची रक्कम स्वत: वितरीत केली व महामंडळाच्या योजनांतर्गत आजपर्यंत ६१,४११ लाभार्थ्यांना बँकेने वितरीत केलेल्या रु. ४,३६७ कोटीच्या कर्ज रकमेबाबत व महामंडळाने ५०,२८५ लाभार्थ्यांना व्याज परतावा स्वरुपात वितरीत केलेल्या रु. ४५६ कोटी रक्कमेचे अवलोकन करुन महामंडळाच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले. मुख्यालयात भेट दिल्यानंतर उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी महामंडळाकरिता लवकरच नवी मुंबईसारख्या शहरामध्ये भव्य इमारतीकरिता जागा उपलब्ध करुन देण्याकरिता राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्यासमवेत चर्चा करण्याची ग्वाही दिली.



## दुधनीत मुस्लीम समाज संघटनेतर्फे गुणवंत विद्यार्थांचा सत्कार संपन्न

अक्कलकोट/प्रतिनिधीः दुधनी येथील मुस्लीम समाज संघनेच्या सभागृहात मुस्लीम युवक संघटना व समाजाच्या वतीने १०वी , १२ वी व निट परीक्षेत प्रथम , दुसरा व तिसरा क्रमांकाने पास झालेल्या विद्यार्थांच सत्कार माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आले.अध्यक्षस्थानी गुलाबसाहेब खैराट हे होते . यावेळी माजी सभापती प्रथमेश म्हेत्रे, मुख्याधिकारी अतिष वाळुंज, मुस्लीम समाज अध्यक्ष जिलानी नाकेदार हे उपस्थित होत.मातोश्री लक्ष्मीबाई म्हेत्रे प्रशाला व एस.जी.परमशेट्टी प्रशालेतील भाग्यश्री बाहेरमठ, निकिता ठक्का , वर्षा बंडगर, अष्कीया बंदगी, शुभम मोसलगी,फातिमा ईटगी, लक्ष्मी कोळी, इत्यादींचा शाल ट्राफी व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले. यावेळी माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, अतिष वाळुंज, शांतू घोडमनी, सैदपा झळकी यांनी मनोगत व्यक्त केले .

सुत्रसंचालन जमादार सर यांनी तर आभार प्रदर्शन अल्ताफ खैराट यांनी मानले. सदर कार्यक्रम मुस्लीम समाज व मुस्लीम युवकांनी आयोजित केला होता . NEET परीक्षेत ७२० पैकी ६३६ गुण मिळवलेल्या प्रज्वला धोडमनी व ऐश्वर्या कलशेट्टी ६२८ यांचा व कन्नड भाषा परीक्षेत (९७ %) गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवलेल्या लक्ष्मी कोळी यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आले

## जागतिक विक्रमवीर कुमारी अन्वी घाटगे हिला मुक्ता फाउंडेशन कोल्हापूर कडून शुभेच्छा



पत्रकार नामदेव निर्मळे

कोल्हापूरची सुवर्णकन्या कुमारी अन्वी घाटगे यांनी वयाच्या दुसऱ्या वर्षी महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर कळसुबाई शिखर सर करून सर्वांना आश्चर्यचकित केले होते.

तिची नोंद आशिया बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये झाली. मूर्ती लहान कीर्ती महान या म्हणी प्रमाणे जगात भारी आम्ही कोल्हापुरी हिने करून दाखवले.जागतिक विक्रमवीर गिर्यारोहक अन्वी घाटगे दुसऱ्यादा महाराष्ट्रातील सर्व्वोच शिखर सर करण्यासाठी रवाना होत असताना मुक्ता फौंडेशन, कोल्हापूर यांच्या वतीने शुभेच्छा देणेत आले. यावेळी मा. प्रा. अमोल महापुरे, डॉ. बी. एम. हिर्डीकर, डॉ. शोभा चाळके, मा. विजय सर उपस्थितीत होते.

## ई-पीक पाहणी मोबाईल पच्या सहाय्याने पिकाची नोंदणी करा : आर एस भासगी

अक्कलकोट/प्रतिनिधीः ई-पीक पाहणी मोबाईल पच्या सहाय्याने सर्व खातेदार शेतकऱ्यांनी तलाठ्याकडे न जाता स्वतःच्या मोबाईलवरून आपल्या ७/१२ वर विविध पिकांची नोंदणी करता येणे शक्य झाले आहे.महसूल विभागाचा ई-पीक पाहणी प्रकल्प १५ ऑगस्ट २०२१ पासून राबविण्यात येत आहे.या पमध्ये आतापर्यंत शेकडो अधिक शेतकऱ्यानी रेजिस्ट्रेशन करून पिकांची नोंदणी केलेली आहे.

एक जुलैपासून मोबाईल ॲपद्वारे पिकाची नोंदणी करून घ्यावे अशी माहिती मंडल अधिकारी आर.एस.भासगी व तलाठी सचिन चव्हाण यांनी पत्रकारशी बोलताना दिली आहे.

खरीप हंगाम २०२३ पीक पाहणी नोंदणीसाठी ई-पीक पाहणीचे २.०.११ हे अपडेटेड व्हर्जन गूगल प्ले स्टोअर वर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

तरी सर्व खातेदार शेतकऱ्यांनी नवीन व्हर्जन अपडेट करून घेणे आवश्यक आहे.खरीप हंगामाच्या प्रत्यक्ष ई-पीक पाहणी मोबाईल ॲपद्वारे पीक पाहणी करण्यासाठी ०१ जुलै २०२३ पासून सुरु करण्यात येत आहे.

तरी जेऊर मंडळातील सर्व शेतकरी बंधु-भगिनींना अवाहन करण्यात येते कि, त्यांनी खरीप हंगामा२०२३ साठी दिलेल्या कालावधीमध्ये आपली ई-पीक पाहणी नोंदणी पूर्ण करावी जेणे करून शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यास अडचण येणार नाही.

## सोलापूरच्या माणसांत प्रेमळपणा दिसला, कलाकारांनी केलं सोलापूरकरांचं तोंड भरून कौतुक

सोलापूर/प्रतिनिधीः कोल्हापूरकरांच्या बोलीत रांगडेपण दिसतं,मुंबईतील माणसं धावती दिसतात अन् सोलापूरच्या माणसांत प्रेमळपणा दिसला,असं कलर्स मराठी वाहिनीवर सुरू असलेल्या अनेक मालिकांमधील कलाकारांनी पत्रकारांशी म्हटले.त्यांनी सोलापुरात फेरफटका मारल्यानंतर सोलापूरकरांचं तोंड भरून कौतुक केले.कलर्स मराठी वाहिनीवर सुरू असलेल्या कस्तुरी,जीव माझा गुंतला,काव्यांजली,रमा राघव,सुंदरा मनामध्ये भरली,जय जय स्वामी समर्थ,भाग्य दिले तू मला आणि योगयोगेश्वर जय शंकर या मालिकांमधील कलाकार आषाढी एकादशीला पांडुरंगाचं दर्शन घेण्याच्या भावनेने एकत्रितपणे सोलापुरात आले होते.त्यांनी बुधवारी ग्रामदैवत श्री सिध्देश्वरांचं दर्शन घेतले,त्याचबरोबर काही स्थळांना भेटी दिल्या.अभिनेता अशोक फळदेसाई,अभिनेत्री एकता लब्दे,अभिनेत्री योगिता चव्हाण,अभिनेता सौरभ चौघुले,अभिनेत्री कश्मिरा कुलकर्णी,अभिनेत्री प्राप्ती रेडकर,अभिनेता निखिल दामले,अभिनेत्री ऐश्वर्या शेटे,अभिनेता कुणाल धुमाळ,अभिनेत्री अक्षया नाईक,अभिनेता विवेक सांगळे,अभिनेत्री तन्वी मुंडले आणि अभिनेता संग्राम समेळ आदी कलाकार यावेळी उपस्थित होते.त्यातील अनेक कलाकार पहिल्यांदाच सोलापुरात आले होते.कलर्स मराठीवरील या मालिकांच्या प्रमोशन्सच्या उद्देशाने महाराष्ट्र फिरत असताना,चांगले नवं-नवे अनुभव मिळत आहेत.मालिकांची प्रेक्षकांच्या मनात असलेल्या कलाकारांविषयीच्या आस्थेचा परिचय देतात, हे आम्हाला पदोपदी जाणवते,असेही त्यांनी पत्रकारांशी बोलताना प्रारंभी म्हटले.बहुतांशी मालिकांमध्ये साचाबध्द तीच-ती मांडणी असते, त्यातून आपण समाजाला कोणता संदेश देऊ पाहता असे विचारले असता, मालिका अनेक भागात दीर्घकाल चालणारा विषय असतो. त्यात कौटुंबिक प्रेम, कलह आणि कलहातून निर्माण होणारे प्रश्न आणि समस्या या भोवती त्या फिरत असतात.’योगयोगेश्वर जय शंकर’ मालिकेतील शंकराची भूमिका साकारत असलेले अभिनेता संग्राम समेळ यांना त्यांच्या भूमिकेविषयी विचारले असता, ही भूमिका सर्वांच्या श्रध्देचा अन् जिव्हाळ्याचा विषय आहे.त्या अनुषंगाने एक आव्हानात्मक असल्याचे सांगितले.



**मुख्यमंत्री शिंदे यांच्याशी कलाकारांची सदिच्छा भेट**

पंढरीच्या आषाढी वारीनिमित्त शासकीय पूजेसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सोलापुरात आले होते.ते पंढपूरला रवाना होण्यापूर्वी ते ज्या हॉटेलमध्ये थांबले होते,तेथेच थांबलेल्या कलर्स मराठी वाहिनीवरील अनेक मालिकेमधील कलाकारांनी मुख्यमंत्र्यांची सदिच्छा भेट घेतली.त्यावेळी त्यांच्यासोबत फोटोसेशन करण्यात आले.

**श्री सिध्देश्वर मंदिर तसेच तलाव रम्य,विलोभनिय**

श्री सिध्देश्वर मंदिर तसेच तलाव रम्य, विलोभनिय आहे. सोलापूरचे रस्ते टाप-टीप वाटले, रस्ते स्वच्छ होते, खऱ्या अर्थाने सोलापूर स्मार्ट सिटी होत आहे, असेही ते म्हणाले. पंढरपूरच्या वारीविषयी विचारले असता, प्रमुख पालख्या पुण्यातून येत असल्याने आजपर्यंत वारीचा प्रारंभ पाहिला, एकमेकांना माऊली, माऊली म्हणत वारीत वारीत सामावतात, मात्र पहिल्यांदा पंढरपुरात वारी अनुभवणार असल्याचेही त्यांनी शेवटी सांगितले.